I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** महात्मा फुले चौक  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0193  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2022 08:17 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 23/03/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/03/2022

**Time From (वेळेपासून):** 11:13 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:01 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/03/2022  **Time (वेळ):** 16:35 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 013  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2022 08:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तलाठी सजा शहाड कार्यालय,राधाकष्ण संकुल, तळ मजला, हालीक्रास हास्पीटलचे समोरनुतन ,कर्णिक रोड, कल्याण पश्चिम

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):** .

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** उत्तम रामचंद्र शिरोशे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु कांबा, पो वरप, ता कल्याण,9764246687/ 7058414375,कल्याण तालुका,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु कांबा, पो वरप, ता कल्याण,9764246687/ 7058414375,कल्याण तालुका,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनंता भास्कर कंटे खाजगी इसम | | | 1. रूम नंबर 206, दुसरा माळा,बिल्डींग नंबर 10, पनवेलकर ,हाईटस, बेलवली बदलापूर पश्चिम ,बदलापूर पश्चिम,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती अमता प्रमोद बडगुजर लोकसेविका | | | 1. तलाठी सजा शहाड कार्यालय, राधाकष्णसंकुलतळमजलाहालीक्रास, हास्पीटलचेसमोरनुतनविद्यालयाच्य, बाजुला, कर्णिक रोड, कल्याण प,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15,000/ रू. | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 15,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, उत्तम रामचंद्र शिरोशे, वय-46 वर्षे, व्यवसाय- बांधकाम मटेरियल सप्लायर्स, राहणार- मु.कांबा, पो.वरप, ता.कल्याण, जिल्हा ठाणे, शिक्षण- निरक्षर, मोबाईल नंबर 9764246687/ 7058414375.मी वरील अर्जदार वर नमुद पत्त्यावर माझे जन्मा पासुन, परिवारासह राहणेस आहे व सन 2009 पासुन एक तुही निरंकार ट्रान्सपोर्ट या नावाने मी माझा बांधकाम मटेरियल सप्लायर्सचा व्यवसाय कल्याण-मुरबाड भागात करतो. कांबागाव मुरबाड-कल्याण रोड येथे सेक्रेड हायस्कुलच्या समोर माझे कार्यालय असुन, त्या ठिकाणाहुनच मी माझा बांधकाम मटेरियल सप्लायर्सचा व्यवसाय करतो.मिरिंडेयन स्कुल, कांबागाव मुरबाड रोड येथे माझे स्वतःचे मालकीचे एकुण 04 गाळे असुन, त्यापैकी एका गाळ्यात माझे स्वतःचे कार्यालय असुन, उर्वरित तीन गाळे मी माझे मित्रांना त्यांचे व्यवसायाकरीता दिलेले आहेत व ते त्यामध्ये त्यांचे व्यवसाय करतात. जुलै 2021 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, आमचे परिसरात सर्वत्र पावसाचे पाणी साचले होते. त्यामध्ये माझे मालकीचे वर नमुद चारही गाळे पावसाचे पाण्याखाली गेले होते. त्यामुळे माझे चारही गाळयांचे व माझे तिन मित्रांचे भरपुर प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर पावसाचे पाणी ओसरल्यानंतर तलाठी सजा शहाड कार्यालयातील तलाठी आणि कोतवाल श्री. कंटे असे दोघेजण माझे वरील नमुद गाळयांचे पंचनामा करण्यासाठी आले व त्यांनी त्यावेळी माझे चारही गाळयांचे व त्या गाळयांमध्ये माझे व माझे मित्रांचे असलेल्या साहित्याचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे केले व झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई षासनाकडुन मंजुर झाल्यानंतर मिळणार असल्याचे मला त्यावेळी कोतवाल श्री.कंटे यांनी सांगितले होते. त्यानंतर माहे फेब्रुवारी 2022 मध्ये (तारीख आठवत नाही) मी तलाठी सजा षहाड कार्यालयात माझे कामानिमित्त गेलो होतो. त्यावेळी मला त्या ठिकाणी कोतवाल श्री.कंटे भेटले. त्यावेळी मी त्यांना आमचे गाळयांचे नुकसान भरपाईची रक्कम कधी मिळणार याबाबत त्यांना विचारले असता, त्यावेळी त्यांनी सांगितले की, अजुन तुमच्या नुकसान भरपाईचा चेक आलेला नाही. चेक आल्यावर तुम्हाला तुमची नुकसान

भरपाईची रक्कम मिळुन जाईल असे मला श्री. कंटे यांनी सांगितले.त्यानंतर दिनांक 16/03/2022 रोजी मला माझा मित्र श्री. राजेष वाळिंबे, वय. 47 वर्षे, राहणार-कांबागाव, ता.कल्याण, जि.ठाणे यांनी, लवकरच आपल्या सगळयांना गाळयांचे झालेल्या नुकसानीचे भरपाईचा चेक मिळणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझा मित्र राजेश यास कधी मिळणार आहे चेक ? व चेक घेण्यासाठी तलाठी कार्यालयात जावे लागेल का ? असे विचारले असता, राजेशने मला सांगितले की, कदाचित याच महिन्यात चेक मिळणार आहेत व त्यासाठी आपल्याला तलाठी कार्यालयात जाण्याची गरज नाही. तलाठी कार्यालयातील कर्मचारी स्वतः जागेवर येवुन आपल्याला चेक देणार असल्याबाबत राजेशने मला सांगितले. त्यानंतर दिनांक 19/03/2022 रोजी मी फराटपाडा, वांगणी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे एका दशक्रीया विधीसाठी गेलो असता, दुपारी 12.30 वाजताचे सुमारास मला माझा मित्र राजेश याचा, त्याचे मोबाईल क्रमांक 9270437240 वरुन माझा मोबाईल फोन नंबर 9764246687 वर फोन आला व त्यावेळी राजेशने मला, श्री.कंटे हे नुकसान भरपाईचे चेक घेवुन आले आहेत व त्यांनी मला व इतर लोकांना झालेल्या नुकसान भरपाईचे चेक दिलेले आहेत. तर तुझा चेक मी त्यांचेकडुन घेवुन का ? असे मला राजेश याने फोनवरुन विचारले. त्यावेळी मी त्याला माझा चेक घेण्याबाबत सांगुन, फोन कंटे यांना देण्यास सांगितले. त्याप्रमाणे राजेश यांनी फोन श्री.कंटे यांना दिल्यावर, श्री. कंटे यांनी तुमचा चेक मी तुमच्या मित्राकडे देतो व त्याची रजिस्टरवर सही घेतो. असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना ठिक आहे, माझा चेक राजेशकडे देण्यास माझी काही एक हरकत नसल्याचे सांगुन, फोन कट केला. त्यानंतर दिनांक 20/03/2022 रोजी सकाळी 09.00 वा.चे सुमारास, माझा मित्र श्री.राजेश वाळिंबे हा मला येवुन भेटला व कोतवाल श्री. कंटे यांनी माझे एका गाळयाचे नुकासान भरपाईचा दिलेला माझ्या नावाचा स्टेट बंक आफ इंडियाचा, दिनांक 16/03/2022 रोजीचा 49,000/- रू.(एकोणपन्नास हजार रू.) चा चेक मला दिला व चेक देते वेळी राजेश वाळिंबे यांनी, नुकसान भरपाईची रक्कम मिळवुन दिल्याचा मोबदला म्हणुन कोतवाल श्री. कंटे यांनी गाळा धारकाकडुन प्रत्येकी 15,000/- रू. लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले व तुला देखील 15,000/- रू. लाचेची रक्कम घेवुन तलाठी सजा षहाड कार्यालय येथे कोतवाल श्री. कंटे यांनी भेटण्यास सांगितले. मला लोकसेवक श्री. कंटे, कोतवाल, तलाठी सजा शहाड यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. म्हणून त्यांचे विरूध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेकरीता मी दिनांक 22/03/ 2022 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे. त्यानंतर पोनि ढगे-पाटील यांनी माझे तक्रारीचे अनुषंग◌ाने दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करणे आवष्यक असल्याचे सांगुन, मा. नगर भूमापन अधिकारी ठाणे यांचे कार्यालयातील दोन शासकीय पंचाना दिन◌ाक 23/03/2022 रोजी बोलाविले. त्या पंचाशी माझी ओळख करून दिली. व माझी तक्रार पंचाना वाचावयास दिली. सदरची तक्रार पंचानी वाचून त्यावर सहया केल्यानेतर तसेच पोनि ढगे-पाटील यांनी समक्ष म्हणून सही केली व माझी तक्रार आपल्या ताब्यात घेतली. त्यांनतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 23/03/2022 रोजी पंच साक्षीदार नरेश जाधव, परिरक्षण भूमापक, नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचे उपस्थितीत पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाईचे वेळी माझे कुर्तीच्या आतमधील बनियनमध्ये◌े डिजीटल व्हाईस रेकार्डर लावल्यानंतर मी व पंच नरेष जाधव असे आम्ही तलाठी सजा षहाड कार्यालयात गेलो असता त्या ठिकाणी खाजगी इसम अनंता भास्कर कंटे हे उपस्थित होते. त्यावेळी त्यांना मी नमस्कार करून, मडमबाबत विचारले असता, त्यांनी मडम मिटींगकामी तहसिलदार कार्यालयात गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी कंटे साहेबांना बाकी काय असे विचारले असता, कंटे यांनी गेल्या वर्षी वीस आले होते यावर्षी जास्त काढलेत असे सांगितले. त्यावर मी त्यांना यावर्षी दिडचा होता ना आपला असे विचारले असता, त्यांनी असं नसतं षासनाच्या नियमानुसार यावर्षी जास्त आलेत गेल्या वर्षी कमीच होते असे सांगितले. त्यानंतर मी कंटे यांना राजेष वालींबेला किती आले याबाबत विचारले असता, त्यांनी माझे एवढेच आले असल्याचे स◌ागितले. त्यावर मी त्यांना काय काम आहे असे विचारले असता, त्यांनी मला राजेश काय बोलला नाही का ? असे विचारले असता, मी त्यांना राजेष काय बोलला नाही असे सांगितले. त्यावर कंटे मी सगळयांना सांगितले आहे. त्यावर मी त्यांना किती असे विचारले असता, कंटे यांनी मी राजेशला बोललेलो आहे असे सांगितले. त्यावर मी त्यांना म्हणालो की, बोलायला काय एवढं काय थोडी होतंय असे म्हणालो असता, त्यांनी अवो ते वर दयाचे आपल्याला, वरती कळवावे लागते असे बोलुन,फेडरेशन गेल्यावर्षी वीस पंचवीसच होते यावर्शी आपण दहाने एक्स्ट्रा काढले. असे सांगितले. त्यावर मी त्यांना किती ? असे विचारले असता, कंटे य◌ानी मला बाकी सगळयांना पंधरा पंधरा सांगितले असल्याचे सांगितले. त्यावर मी एवढे नाही करणार ह का असे बोललो असता, कंटे यांनी मला तुम्ही त्यांचेकडे नका बोलु आता काय असे बोलले असता मी त्यांना, मी त्यांच्याजवळ कशाला बोलु असे सांगितले असता, कंटे म्हणाले की नाहीतर ते माझेवर रागावतील. त्यावर मी त्यांना बोललो, मी नाय देणार, मी डायरेक्ट जावुन भेटतो मग असे बोललो असता, कंटे यांनी मा मधी येताय असे विचारले. त्यावर मी त्यांना पंचांकडे इशारा करून, यांचे रजिस्टर आहे ते करून लगेच येतो असे सांगितले. त्यावर कंटे फोन करतो म्हणजे असे म्हणाले असता, मी त्यांना फोनवर मी बोलत नाय असे सांगितले. त्यावर कंटे यांनी मला चेक देवु का नको हे कन्फर्म केला उदया तुम्ही बोलणार कंटे तुम्ही त्याचेकडे कसा दिला, राजेशला फोन लाव. ही अषी वस्तु आहे की जबाबदारीची आहे. उदया बोलणार का नाही दिला. समोरा समोर बोलण झालेका मोकळा ताप नको डोक्याला. असे कंटे मला बोलले आणि सगळयांकडुन घेणार तुम्ही टेन्शन नका घेवु, त्यांना बोललो पंधरा तुम्ही बोलु नका तुम्ही नुकसान कराल, तुम्ही नका त्यांना बोलु असे मला कटे बोलले. त्यावर मी त्यांना मी कशाला बोलु कोणाला असे बोललो असता, कंटे यांनी बारा तरी दया आम्हाला असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ठिक आहे चल बघु मी येतो नंतर असे बोलुन मी व पंच श्री. नरेश जाधव असे आम्ही त्या कार्यालयातुन बाहेर आलो व माझे फोर व्हीलर कारने पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबुन राहिले होते त्या ठिकाणी परत आलो.वरील प्रमाणे झालेल्या संभाषणावरून पोनि ढगे-पाटील यांनी पंचास व मला सांगितले की, खाजगी इसम अनंता भास्कर कंटे यांनी माझे अतिवृष्टीत झालेल्या गाळयाचे नुकसान भरपाईची रक्कम मिळवून दिल्याचा मोबदला म्हणून 15,000/- रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन सुरू असलेल्या कारवाईमध्ये पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा व सापळा पंचनामा स्वतंत्रपणे करणे करीता पुरेसा अवधी नसल्याने तसेच खाजगी इसम अनंता भास्कर कंटे यास संशय येवु नये म्हणुन पोनि ढगे-पाटील यांनी पंचांशी व माझेशी चर्चा करून सदर कारवाई मध्ये पडताळणी, सापळापूर्व व सापळा पंचनामा एकत्रीत करण्याचा निर्णय घेतला. व लागलीच मोहने-आंबिवली रोड, मंगेशी पराडाईज समोर शासकीय वाहनातच सापळा पुर्व पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय पोनि ढगे-पाटील यांनी घेतला व त्याचवेळी पोनि ढगे-पाटील यांनी पंचासमक्ष मला खाजगी इसम अनंता भास्कर कंटे यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम 15,000/- रूपये आहे काय ? याबाबत विचारले असता, माझेकडे माझे स्वबचतीतले 15,000/- रूपये असल्याचे असे सांगितले. त्यानंतर पोनि ढगे-पाटील यांचे सुचनेनुसार मी लाचेची रक्कम 15,000/-रू. हजार केले असता दिनांक 23/03/2022 रोजी तलाठी सजा शहाड कार्यालयात सापळा आजमाविण्याचा निर्णय पोनि ढगे-पाटील यांनी घेतला. त्याअनुषंगाने सापळा पुर्व पंचनामा कारवाई पुर्ण झाल्यानंतर सापळा केस कामी हजर केलेले 15,000/- रूपये माझे कुर्तीचे डावे खिषात ठेवुन दिले व सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझे कुर्तीचे आतमध्ये डिजीटल व्हाईस रेकार्डर लावल्यानंतर मी व पंच श्री. नरेश जाधव असे आम्ही तलाठी सजा शहाड कार्यालय, कल्याण येथे खाजगी इसम अनंता भास्कर कंटे यांची भेट घेण्यासाठी गेलो व त्याचवेळी पोनि ढगे-पाटील यांचे सुचनेप्रमाणे उर्वरित सापळा पथक तलाठी सजा शहाड कार्यालय, कल्याण या कार्यालयाचे आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन माझे पुर्व नियोजीत इशा-याची वाट पाहत थांबुन राहिले होते. त्यावेळी मी कंटे यांना आवाज देवुन कार्यालयाचे बाहेर बोलवुन घेतले. त्यावेळी कंटे यांनी मला रजिस्टर झाले का ? याबाबत विचारले असता, मी त्यांना लगेच रजिस्टर होत नाही

असे बोलुन मी विटनेस होतो असे सांगितले व कंटे यंाना बोयलील जमीन घेतली असल्याचे सांगितले. त्यानंतर कंटे यांनी बोयलीला किती असे विचारले असता, मी त्यांना पंधरा आहेत असे बोलुन, आता एक काम घेवुन येत होतो. करून घ्या असे बोलुन पंधरा हजार दिलेत असे म्हणुन मी कंटे यांना लाचेची रक्कम दिली. व माझे हातोच मनगटी घडयाळ काढुन ते रूमालाने पुसण्यासाठी काढुन पुर्व नियोजीत इशारा केला असतांनाच, कंटे यांनी मला शेट तुमचं काम कधी केलं नाही असे बोलले. त्यावर मी त्यांना सात बारा आहे तो फिरवुन दया असे सांगुन मडम हे करील का असे विचारले असता, कंटे म्हणाले काय असेल ते बघु नंतर ते करून देईल असे म्हणाले त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणालो व त्याचवेळी पोनि ढगे-पाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारणारे खाजगी इसमाबाबत माझेकडून माहिती घेवुन, सापळा पथकाने खाजगी इसम अनंता कंटे यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडुन ठेवले. त्यावेळी पोनि ढगे-पाटील यांनी स्वतःची व दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांची खाजगी

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): पो.हवा.। ५६६६ पालकर ~~SAGAR SARJIRAO CHAVAN~~

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रिपोर्टसह एफआयआर प्रत मिळाले

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(signature) 28/3/22

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस ठाणे अमलदार

**Name** (नाव): ASHOK BAPU HONMANE

**Rank**(पद): Inspector

**No.**(सं.):

महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन कल्याण

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**